**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, राज्य अग्निशमन नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी व जिल्हा मुख्यालय यांच्या आस्थापनेवर नव्याने १३१ पदे निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.१४०/नवि-१४,**
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ मार्च, २०२१.

वाचा :-
१. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एफएफएस-१६२००३/७५३/प्र.क्र.८६/२००३/नवि-६, दि.२०.१०.२००३
२. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एफएफएस-१६२००३/३५७/प्र.क्र.३९/२००३/नवि-६, दि.०४.१२.२००३
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशसे-२००९/३०५/प्र.क्र.४८/०९/नवि-२०, दि.१३.०३.२००९
४. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अशसे-१४१०/११८/प्र.क्र.२३/२०१०/नवि-२०, दि.०२.०८.२०१०
५. उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.२४.०६.२०१४ च्या बैठकीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना: -

संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र अग्निशमन सल्लागार कार्यालय व राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवर ४ स्थायी व १४ अस्थायी पदांचा आकृतीबंध विहीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. तसेच, संदर्भ क्र. २ अन्वये अग्निशमन सल्लागार यांच्या आस्थापनेवर संचालक, अग्निशमन सेवा, वर्ग-१ हे पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर, संदर्भ क्र.५ येथील उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीनुसार यापूर्वी मंजूर पदांसह १३१ पदाच्या निर्मितीस उच्च स्तरीय सचिव समितीने मान्यता दिली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने वित्त विभागाच्या मान्यतेनुसार यापूर्वी मंजूर पदांच्या वेतनश्रेणी, नव्याने मंजूर पदे व त्यांच्या वेतनश्रेणी या सह महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचा सुधारित आकृतीबंध विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

अग्निशमन सेवा संचालनालयाच्या कामाचे स्वरुप व जबाबदारीची व्याप्ती विचारात घेता, राज्याचे अग्निशमन विषयक धोरण, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतूदींच्या अनुषंगाने राज्यातील नागरी स्थानिक संस्थाच्या अधिनस्त अग्निशमन सेवे संदर्भातील सर्वंकष नियंत्रणा

संदर्भात एकवाक्यता राहण्यासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय सक्षम करणे आवश्यक आहे. राज्यात होणाऱ्या विविध अपघात, आगीच्या घटना, नैसर्गिक आपत्ती अशा प्रसंगी दोन विविध स्थानिक प्राधिकरणाच्यात समन्वय साधण्याची व त्यासाठी योजना निश्चितीची आवश्यकता या सर्वांचा विचार करता उच्च स्तरीय सचिव समितीने दिलेल्या मंजूरीनुसार यापूर्वी मंजूर एकुण १९ पदे व नव्याने मंजूर ११२ पदे अशा एकुण १३१ पदांच्या सुधारित आकृतीबंध व त्यांच्या वेतनश्रेणी अनुषंगाने पद निर्मितीसंदर्भात वित्त विभागाच्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

उपरोक्त अनुषंगाने उच्च स्तरीय सचिव समितीने दिलेल्या मंजूरीनुसार यापूर्वी मंजूर एकुण १९ पदे व नव्याने मंजूर ११२ पदे अशा एकुण १३१ पदांच्या सुधारित आकृतीबंध व त्यांच्या वेतनश्रेणी अनुषंगाने पद निर्मितीसंदर्भात वित्त विभागाच्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

(अ) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय व महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (प्रशिक्षण केंद्र) यांच्यासाठी यापूर्वी मंजूर ५ स्थायी व १४ अस्थायी कार्यरत पदे वित्त विभागाने मंजूरी दिलेल्या वेतनश्रेणीनुसार विवरणपत्र-अ मध्ये नमुद करण्यात येत आहेत.

(ब) सुधारीत आकृतीबंधातील महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, राज्य अग्निशमन नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी व जिल्हा मुख्यालय यांच्या आस्थापनेवरील पदांचे स्तर निहाय पदांचे विवरण/ तपशील सोबतच्या विवरणपत्र - ब, क, ड व इ नुसार असेल.

(क) सदर आकृतीबंधातील पदांचे सेवा प्रवेश नियम विहीत करणे/ सुधारीत करण्याबाबत संचालक, अग्निशमन सेवा संचालनालय यांनी प्रस्तावित केलेले व आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी तपासून आवश्यक सुधारणेसह मंजूरीस्तव शासनाकडे सादर केलेले सेवा प्रवेश नियम विहीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर मान्यतेअंती अंतिम होणारे सेवा प्रवेश नियम सदर शासन निर्णयान्वये मंजूर आकृतीबंधास लागू राहतील.

(ड) सदर आकृतीबंधातील पदे अत्यावश्यक अग्निशमन सेवेतील असल्याने सदर पदांचे सेवा प्रवेश नियम प्रत्यक्षात मंजूर होऊन त्यानुसार संवर्गातील पद भरती होईपर्यंत सदर पदे रिक्त राहणे उचित नाही. सबब सेवा प्रवेश नियम विहीत होऊन सदर पद भरतीची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत सदर पदावर सेवा प्रवेश नियमात प्रस्तावित केलेल्या अर्हता व निकषांशी समकक्षता असणारे शासनाची महामंडळे, नागरी स्थानिक संस्था इ. मधील अधिकारी / कर्मचारी यांची विहित पध्दतीने प्रतिनियुक्तीने नियुक्ती सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

२. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे प्रस्तावानुसार आकृतीबंधातील सदर पदांचा वेतन व अनुषंगिक खर्च महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील कलम २५ मधील तरतदूींनुसार गठीत अग्निसुरक्षा निधीमधुन भागविण्यास यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अ.नौ.संदर्भ क्र.३६७/आपुक, दि.१९.०१.२०२१ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३२६११४२०११८२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sachin Dattatray Sahasrabuddhe

Digitally signed by Sachin Dattatray Sahasrabuddhe
DN: CN = Sachin Dattatray Sahasrabuddhe, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.03.26 18:07:59 +05'30'

**( सचिन द. सहस्रबुध्दे )**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत: -**

१. मा.राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री(वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री(नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग/ सामान्य प्रशासन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई.
११. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व)
१३. जिल्हाधिकारी (सर्व)
१४. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
१५. सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. प्रादेशिक उप संचालक, नगरपरिषद प्रशासन विभाग (सर्व)
१७. जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व)
१८. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायती)
१९. निवडनस्ती (नवि-१४).

**विवरणपत्र-अ**

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय कार्यरत मंजूर पदे**

| अ. क्र. | स्तर | पदनांम | वेतन स्तर | ७ वा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | **महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय** | संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा | एस-२५ | ७८८००-२०९२०० | १ |
| २ | | वरिष्ठ लिपिक | एस-०८ | २५५००-८११०० | १ |
| ३ | | लिपिक-टंकलेखक | एस-०६ | १९९००-६३२०० | १ |
| ४ | | वाहनचालक (बाह्यस्त्रोताने) | एस-०६ | १९९००-६३२०० | १ |
| ५ | | शिपाई (बाह्यस्त्रोताने) | एस-०१ | १५०००-४७६०० | १ |
| | **एकूण** | | | | **५** |
| १ | **महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी** | वरिष्ठ-प्रशिक्षक | एस-१६ | ४४९००-१४२४०० | १ |
| २ | | अधिक्षक | एस-१४ | ३८६००-१२२८०० | १ |
| ३ | | लेखापाल | एस-१४ | ३८६००-१२२८०० | १ |
| ४ | | लघुलेखक | एस-१४ | ३८६००-१२८०० | १ |
| ५ | | कनिष्ठ प्रशिक्षक | एस-०८ | २५५००-८११०० | १ |
| ६ | | अग्निशमन प्रणेता | एस-०८ | २५५००-८११०० | १ |
| ७ | | चालक यंत्रचालक | एस-०८ | २५५००-८११०० | १ |
| ८ | | अग्निशामक | एस-०६ | १९९००-६३२०० | ४ |
| ९ | | शिपाई (बाह्यस्त्रोताने) | एस-०१ | १५०००-४७६०० | १ |
| १० | | रखवालदार (बाह्यस्त्रोताने) | एस-०१ | १५०००-४७६०० | १ |
| ११ | | सफाई कामगार (बाह्यस्त्रोताने) | एस-०१ | १५०००-४७६०० | १ |
| | **एकूण** | | | | **१४** |

Sachin Dattatray Sahasrabuddhe

Digitally signed by Sachin Dattatray Sahasrabuddhe
DN: CN = Sachin Dattatray Sahasrabuddhe, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.03.26 18:08:19 +05'30'

( सचिन द. सहस्त्रबुध्दे )
शासनाचे अवर सचिव

| विवरणपत्र-ब | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय नव्याने मंजूर पदे | | | | | |
| **अ. क्र.** | **स्तर** | **पदनांम** | **वेतन स्तर** | **७ वा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी** | **प्रस्तावित पदे** |
| १ | **महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय** | सहाय्यक संचालक | एस-२० | ५६१००-१७७५०० | २ |
| २ | | लेखापाल | एस-१४ | ३८६००-१२२८०० | १ |
| ३ | | अग्निशामक-विमोचक | एस-०६ | १९९००-६३२०० | १ |
| | **एकूण** | | | | **४** |

| विवरणपत्र-क | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| राज्य अग्निशमन सेवा नियंत्रण कक्ष नव्याने मंजूर पदे | | | | | |
| **अ. क्र.** | **स्तर** | **पदनांम** | **वेतन स्तर** | **७ वा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी** | **प्रस्तावित पदे** |
| १ | **राज्य अग्निशमन सेवा नियंत्रण कक्ष** | सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी | एस-१७ | ४७६००-१५११०० | ४ |
| २ | | अग्निशमन केंद्र अधिकारी | एस-१६ | ४४९००-१४२४०० | ४ |
| ३ | | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | एस-१५ | ४१८००-१३२३०० | ४ |
| ४ | | अग्निशामक-विमोचक | एस-०६ | १९९००-६३२०० | ४ |
| | **एकूण** | | | | **१६** |

Sachin Dattatray Sahasrabuddhe

Digitally signed by Sachin Dattatray Sahasrabuddhe
DN: CN = Sachin Dattatray Sahasrabuddhe, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.03.26 18:08:36 +05'30'

(सचिन द. सहस्त्रबुध्दे)
शासनाचे अवर सचिव

| विवरणपत्र-ड | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी नव्याने मंजूर पदे | | | | | |
| अ. क्र. | स्तर | पदनाम | वेतन स्तर | ७ वा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | प्रस्तावित पदे |
| १ | महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी | सहाय्यक समादेशक अधिकारी | एस-२० | ५६१००-१७७५०० | १ |
| २ | | वरिष्ठ प्रशिक्षक/ केंद्र अधिकारी | एस-१६ | ४४९००-१४२४०० | २ |
| ३ | | ग्रंथपाल | एस-१० | २९२००-९२३०० | १ |
| ४ | | उप अग्निशमन अधिकारी/ कनिष्ठ प्रशिक्षक | एस-०८ | २५५००-८११०० | ४ |
| ५ | | प्रयोगशाळा सहाय्यक | एस-०८ | २५५००-८११०० | १ |
| ६ | | वरिष्ठ लिपिक | एस-०८ | २५५००-८११०० | १ |
| ७ | | प्रमुख अग्निशामक विमोचक | एस-०८ | २५५००-८११०० | १ |
| ८ | | चालक-यंत्रचालक | एस-०८ | २५५००-८११०० | १ |
| ९ | | वसतीगृह भांडारपाल | एस-०६ | १९९००-६३२०० | १ |
| १० | | लिपिक-टंकलेखक | एस-०६ | १९९००-६३२०० | १ |
| ११ | | अग्निशामक-विमोचक | एस-०६ | १९९००-६३२०० | ६ |
| | **एकूण** | | | | **२०** |

| विवरणपत्र-इ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा मुख्यालय नव्याने मंजूर पदे | | | | | |
| अ. क्र. | स्तर | पदनाम | वेतन स्तर | ७ वा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | प्रस्तावित पदे |
| १ | जिल्हा मुख्यालय | सहाय्यक संचालक | एस-२० | ५६१००-१७७५०० | ३६ |
| २ | | अग्निशमन केंद्र अधिकारी | एस-१६ | ४४९००-१४२४०० | ३६ |
| | **एकूण** | | | | **७२** |

Sachin Dattatray Sahasrabuddhe

Digitally signed by Sachin Dattatray Sahasrabuddhe
DN: CN = Sachin Dattatray Sahasrabuddhe, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.03.26 18:08:58 +05'30'

**(सचिन द.सहस्त्रबुध्दे)**
**शासनाचे अवर सचिव**